॥ या विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

**Phone : (02462) 215525** **DEPARTMENT OF STUDENTS DEVELOPMENT** **Website: srtmun.ac.in**

**Fax : (02462) 215572** **E-mail: dir.dsd@srtmun.ac.in**

जा.क्र./वि.वि.वि/२०२४–२५/१६३ दिनांक : २३/०१/२०२५

प्रति,

मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये.

मा. संचालक, सर्व शैक्षाणिक संकुले, विद्यापीठ परिसर.

मा. संचालक, विद्यापीठ उपकेंद्र, पेठ, लातूर.

मा. संचालक, विद्यापीठ उपकेंद्र, परभणी.

मा. प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली.

मा. समन्वयक कै. उत्तमराव राठोड आदीवासी संशोधन केंद्र किनवट.

**विषय** : प्रजासत्ताक दिन– भारतीय सुजाण–सजग नागरिकत्व जागर अभियान भारतीय नागरिकत्वाची दीक्षा–प्रतिज्ञेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, भारतीय सुजाण–सजग नागरिकत्व जागर अभियान महात्मा गांधी सर्वोदय भवन, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने राबविण्यात येते. दि. २६ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताक दिनी वयाची १८ वर्ष पूर्ण करणा–या युवकांना महाविद्यालयातील राष्ट्रध्वज वंदन कार्यक्रम प्रसंगी त्यांना प्रमुख अतिथीच्या वतीने सुजाण–सजग नागरिकत्वाची दीक्षा–प्रतिज्ञा देण्यात यावी अशी विनंती केली. त्याअनुषंगाने सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार प्रजासत्ताक दिनी महाविद्यालयातील राष्ट्रध्वज वंदन कार्यक्रम प्रसंगी प्रमुख अतिथीच्या वतीने सुजाण–सजग नागरिकत्वाची दीक्षा–प्रतिज्ञा द्यावी व केलेल्या अंमलबजावणीचा अहवाल **dir.dsd@srtmun.ac.in** या ई–मेलवर पाठवावा, ही विनंती.

धन्यवाद,

सोबत: नागरिकत्वाची प्रतिज्ञा.

**डॉ. सुर्यप्रकाश जाधव**
संचालक
विद्यार्थी विकास विभाग

श्री. अजय दर्शनकार, सीस्टीम एक्सपर्ट, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Circular Regarding **प्रजासत्ताक दिन- भारतीय सुजाण-सजग नागरिकत्व जागर अभियान भारतीय नागरिकत्वाची दीक्षा-प्रतिज्ञेबाबत.** या शिर्षकाखाली विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील Home page मधील Administration & Students' Development सदराअंतर्गत प्रसिध्दिस देण्यात यावे.



# नवभारत निर्माण सजग नागरिकत्व जागर अभियान

## प्रजासत्ताक दिन, २६ जानेवारी

### महात्मा गांधी सर्वोदय भवन, औरंगाबाद

महाविद्यालयाचे नांव : ______________________________

## भारतीय सजग नागरिकत्व जागर अभियान

विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव: ______________________________ वर्ग :

पत्ता : ______________________________

मो. नं.: Email : ______________________________

जन्मदिनांक: १८ वर्षे पूर्ण झाल्याचा दिनांक :

## नागरिकत्वाची प्रतिज्ञा

मी, ______________________________ आजच्या प्रजासत्ताक दिनी राष्ट्रध्वज तिरंग्यास अभिवादन करीत असताना गंभीरपणे प्रतिज्ञा करतो / करते की, माझे वय १८ वर्षे पूर्ण झालेले आहे व मी भारताचा / भारताची नागरिक होण्यास पात्र झालेलो / झालेली आहे.

भारतीय राज्यघटनेतील मूल्ये समाजवाद, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जा व संधीची समानता, व्यक्तीची प्रतिष्ठा, राष्ट्राची एकात्मता, बंधुता यांमध्ये माझी बांधिलकी राहील व त्याच्या संवर्धनासाठी व्यक्तिगत व सामूहिक प्रयत्न करीन भारतीय लोकशाही अधिक अर्थपूर्ण व प्रगल्भ व्हावी यासाठी मी नागरिक म्हणुन हक्का बरोबर कर्तव्याची जाण ठेवीन.

भारतीय स्वातंत्र्यसंग्राम व हैद्राबाद मुक्तिसंग्रामात हुतात्मा झालेले स्वातंत्र्य सैनिक यांचे त्याग, बलिदान याची सदादित आठवण ठेवील. त्यांच्या प्रती कृतज्ञभाव जोपासेल. नवभारत निर्माणात सजग सुजाण नागरिक म्हणून तत्परतेने सहभागी होत राहील. सामाजिक सद्भाव, सलोखा संवर्धनासाठी क्रियाशील राहील. राष्ट्रीय संपत्ती, ऐतिहासिक ठेवा यांचे जतन, संवर्धन करील पर्यावरण रक्षण व संवर्धनासाठी मी कार्यरत राहील शाश्वत संतुलित विकासासाठी आवश्यक निसर्गस्नेही जीवनशैली अंगीकारील.

खंडप्राय, विविधतेने नटलेला प्राचीन संस्कृती, अनेक धर्माचे उगमस्थान, जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारतास विश्वमंचावर अहिंसा, सहअस्तित्व, सहकार्य, समन्वय व विश्वशांतीसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्यासाठी ऐतिहासिक जबाबदारीचे भान मला आहे.

स्थान : दिनांक : स्वाक्षरी-

( नांव : ______________________________ )

टीप : नागरिकत्वासाठी पात्र विद्यार्थ्यांने प्रपत्र दोन प्रतीत भरावे. एक प्रपत्र महाविद्यालयाच्या व एक स्वतःच्या संग्रहासाठी ठेवावे. स्वतःकडील संग्रहीत प्रपत्र अधूनमधून अवलोकन करीत जावे. या प्रतिज्ञेची आठवण ठेवून मनोनिर्धार कायम राहील असे पहावे.